**<u>नियमित दिवाणी दावा क. ४५/२०१८ मधील निशाणी क. ३४ वरिल आदेश</u>**

(अक्षय गावडे वि. प्रेमल वाघ)

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क. १ यांचे वारस फैलावर घेण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क. १ प्रेमल वसंत वाघ या दिनांक २७.०८.२०२२ रोजी मयत झाल्या. त्यांना संजय वसंत वाघ, अजय वसंत वाघ, बाळासाहेब वसंत वाघ व बेबी वसंत वाघ हे वारस आहेत. सदर वारसांना दाव्यात सामील करावे. सदरची दुरूस्ती ही किरकोळ असून त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरूपात बदल होणार नाही. प्रतिवादी क. १ यांच्या नावापुढे मयत असे लिहुन त्यांचे वारस १अ ते १ड दाव्यात दुरूस्तीने समाविष्ट करण्यात यावे.

**०२.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा ०५ वर्षे जुना आहे. दावा निरंतर ताकीदकरीता व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. अर्जासोबत निशाणी ३५ कडे प्रतिज्ञापत्र दाखल आहे. प्रतिवादी क. १ या दिनांक २७.०८.२०२२ रोजी मयत झाल्याचे वादीने कथन केलेले आहे. मुदतीच्या कायदान्वये ९० दिवसांच्या आत मयताचे वारस अभिलेखावर घेणे क्रमप्राप्त आहे. वादीचा अर्ज दिनांक १०.०८.२०२३ रोजीचा आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करणेस निश्चितच विलंब झालेला आहे. तथापि न्यायाच्या दृष्टीने दाव्यामधील आवश्यक पक्षकार त्यांचे वारस आणि त्यांचे म्हणणे पुरावे दाव्याकामी समाविष्ट करून घेणे हे दाव्याचा गुणदोषावर अंतीम निकाल होण्याकामी आवश्यक आहे. दाव्यामध्ये मिळकतीबाबत असलेला कायदेशीर हक्क अधिकार याबाबतचे प्रश्न महत्वपुर्ण आहेत. सबब वारस दाव्याकामी समाविष्ट करण्याकरीता विलंब माफ करणे आणि त्यांना दावा चालवणे कामी संधी देणे योग्य होणार आहे. प्रतिवादी क. १ यांना प्रस्तुत अर्जामध्ये १अ ते १ड हे वारस नमूद आहे. सदर वारसांना दाव्यात समाविष्ट करून त्यांचे म्हणणे मांडून त्यांना संधी देणे आवश्यक आहे. वारसांना दाव्याकामी दुरूस्तीने समाविष्ट करण्याची संधी वादीस देण्यात येते. सबब न्यायाच्या दृष्टीने खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. निशाणी ३४ खर्च रक्कम रूपये १००/— भरण्याच्या अटीवर मंजुर करून प्रतिवादी क. १ यांचे वारस दाव्यात समाविष्ट करण्याचा आदेश पारीत.

२. खर्च रक्कम रूपये १००/— सरकार जमा करण्याचा आदेश पारीत.

दिनांक: १०.०८.२०२३

(**एम. ए. के. शेख**)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव